# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक

विषय :-महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे दिनांक ३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे होणाऱ्या विश्व मराठी संमेलन - २०२५ च्या कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उपस्थितीबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था यांचे पत्र क्र.रामविसं/विमंसं/प्र.क्र.११५/प्रकल्प-३/११३/२०२५, दि.२१ जानेवारी, २०२५.

मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा असून ती महाराष्ट्राची लोकभाषा, ज्ञानभाषाही आहे. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संवर्धन ह्यांची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापुरती न राहता त्याची कक्षा देशभरात तसेच अन्य देशांतही विस्तारावी या हेतूने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या द्वारे जगभरातील मराठी-भाषा-प्रेमी आणि मराठी-भाषा-हितेच्छू ह्यांचे विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात येत असते.

या वर्षी दिनांक ३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत फर्ग्यूसन महाविद्यालय, पुणे येथे हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. "अभिजात मराठी" ही या विश्व मराठी संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना असून त्या अनुषंगाने उपरोक्त कालावधीत विविध भाषाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांत भाषा, साहित्य, उद्योजकता, उपक्रमशीलता इ. विविध आयामांवर आधारित असे कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्रे, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश असणार आहे. सदर संमेलनास विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांना तीनही दिवस उपस्थित राहण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्याकरिता मा.संचालक, महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था यांनी संदर्भिय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

सबब, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सदर संमेलनास तीनही दिवस उपस्थित रहावे, ही विनंती.

सोबत : महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था यांचे पत्र क्र.रामविसं/विमंसं/प्र.क्र.११५/प्रकल्प-३/११३/२०२५, दि.२१ जानेवारी, २०२५ ची प्रत.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा. क्र. एटी/60
दिनांक : 22 जानेवारी, २०२५

(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

- मा. संचालक, विद्यापीठ प्रशाळा
- मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
- मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
- मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रकातील आशय संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नादणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com , project3.rmvs@gmail.com

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
प्रशासन शिक्षक कक्ष
दिनांक 22 JAN 2025
146
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**क्र.रामविसं/विमंसं/प्र.क्र.११५/प्रकल्प-३/११३/२०२५**
**दिनांक : २१.०१.२०२५**

प्रति,
मा. कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 633
दिनांक 22.01.2025
दिनांक 22.01.2025
AT

DR-Admin (T)

**विषय : महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे दिनांक ३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे होणाऱ्या विश्व मराठी संमेलन - २०२५ च्या कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उपस्थितीबाबत.**

महोदय,

मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा असून ती महाराष्ट्राची लोकभाषा, ज्ञानभाषाही आहे. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संवर्धन ह्यांची व्याप्ती महाराष्ट्र राज्यापुरती न राहता त्याची कक्षा देशभरात तसेच अन्य देशांतही विस्तारावी ह्या हेतूने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या द्वारे जगभरातील मराठी भाषक, मराठी-भाषा-प्रेमी आणि मराठी-भाषा-हितेच्छू ह्यांचे विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात येत असते.

ह्या वर्षी दिनांक ३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. "**अभिजात मराठी**" ही ह्या विश्व मराठी संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना असून त्या अनुषंगाने उपरोक्त कालावधीत विविध भाषाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांत भाषा, साहित्य, उद्योजकता, उपक्रमशीलता, इ. विविध आयामांवर आधारित असे कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्रे, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश असणार आहे.

तरी, सदर संमेलनास आपल्या विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांना तीनही दिवस उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक

प्रत माहितीसाठी -

१. मा. अपर मुख्य सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. मंत्री, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय साहाय्यक, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई- ३२